**ठळक बातम्या**

- भारत आता तंत्रज्ञानाचा केवळ ग्राहक नसून तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा प्रणेता बनल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- तेलंगणात झालेल्या रस्ते अपघातात १९ जणांचा मृत्यू, २० जण जखमी/ अपघातग्रस्तांना प्रधानमंत्र्यांकडून आर्थिक मदतीची घोषणा

- अमेरिका अण्वस्त्र चाचण्या पुन्हा सुरू करेल, असा अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा

**आणि**

- भारतीय महिला क्रिकेट संघानं पहिल्यांदाच पटकावलं आयसीसी एकदिवसीय विश्वविजेतेपद, विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी विजय

**<><><><><>**

भारत आता तंत्रज्ञानाचा केवळ ग्राहक नाही तर तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा प्रणेता बनला आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्लीमध्ये उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष परिषद २०२५चं उद्घाटन केल्यानंतर ते आज बोलत होते. देशात नवोन्मेषाची परिसंस्था निर्माण व्हावी यासाठी सरकार प्रयत्न करत असून जगातली सर्वात यशस्वी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा भारतात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

या कार्यक्रमात त्यांनी देशातल्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला चालना देण्यासाठी १ लाख कोटी रुपये अर्थसहाय्य देणाऱ्या संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजनेचाही प्रारंभ केला. खासगी क्षेत्राकडून संचलित केल्या जाणाऱ्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला प्रोत्साहन देणं हे या योजनेचं उद्दिष्ट असल्याचं प्रधानमत्र्यांनी सांगितलं.

**होल्ड... बाईट - प्रधानमंत्री**

शिक्षणतज्ञ, संशोधन संस्था, उद्योग आणि सरकारमधल्या ३ हजारांपेक्षा जास्त सहभागींना एकत्र आणणं हे या तीन दिवसीय परिषदेचं उद्दिष्ट आहे. यामध्ये भाषणं, पॅनेल चर्चा, सादरीकरणं आणि तंत्रज्ञान विषयक प्रदर्शनं आयोजित केली जातील. देशाची विज्ञान

आणि तंत्रज्ञान परिसंस्था मजबूत करण्यासाठी संशोधक, उद्योग आणि तरुण नवोन्मेषकांमधल्या सहकार्यासाठी हे योग्य व्यासपीठ ठरेल.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी उत्तराखंड विधानसभेच्या विशेष अधिवेशनाला आज संबोधित केलं. अनेक प्रयत्नांनंतर उत्तराखंडच्या मानवी विकास निर्देशांकात प्रगती झाल्याचं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या. राज्याचा साक्षरता दर वाढल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं.

उत्तराखंडच्या पवित्र भूमीत आध्यात्म आणि शौर्याची सातत्यपूर्ण परंपरा आहे, असं राष्ट्रपती म्हणाल्या.

<><><><><>

तामिळनाडूच्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची गरज होती, असं मत केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी व्यक्त केलं आहे. ते चेन्नई इथं माध्यमांशी बोलत होते. राज्यात आजपासून पुनरीक्षणाची प्रक्रिया सुरू झाली. हे स्वागतार्ह पाऊल असल्याचंही ते म्हणाले. तामिळनाडूत झालेल्या पदभरतीतल्या कथित फसवणूक आणि भात खरेदीच्या आरोपांच्या सीबीआय चौकशीची मागणी त्यांनी यावेळी केली.

<><><><><>

बहारीनचे परराष्ट्र मंत्री अब्दुल लतिफ बिन रशीन अलजयानी काल रात्री तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर नवी दिल्ली इथं पोहोचले. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी त्याचं स्वागत केलं. हे दोन्ही नेते पाचव्या भारत-बहारीन संयुक्त उच्च आयोगाच्या बैठकीचं सहअध्यक्ष पद भूषवणार आहेत, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या समाजमाध्यमावर दिली आहे. या बैठकीत होणारी चर्चा फलदायी होईल, असा विश्वास जयशंकर यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात व्यक्त केला आहे.

<><><><><>

तेलंगणामध्ये रंगारेड्डी जिल्ह्यात चेवेल्लाजवळच्या मिर्जागुडा-खानापूर रस्त्यावर आज सकाळी झालेल्या अपघातात एकूण १९ जणांचा मृत्यू झाला. विकाराबाद-हैदराबाद मार्गावर सकाळी ८ वाजण्याच्या सुमाराला एका दुचाकीला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न

करताना एका ट्रकनं आरटीसी बसला धडक दिल्यामुळे ही घटना घडली. विकाराबादच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ मृतदेह रुग्णालयात पाठवण्यात आलं. तसंच २० जखमींना जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आलं आहे.

अपघाताची माहिती मिळण्यासाठी लोकांना मदत करण्यासाठी राज्य सरकारनं हैदराबादमध्ये एक नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. माहितीसाठी ९९१२९१९५४५ आणि ९४४०८५४४३३ या क्रमांकांवर संपर्क करण्याचं आवाहन मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी केलं आहे. विशेष वैद्यकीय पथकं घटनास्थळी दाखल झाली आहेत.

दरम्यान राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

रशिया, चीन, उत्तर कोरिया आणि पाकिस्तान अण्वस्त्र चाचण्या करत आहेत. त्यामुळे अमेरिकाही अण्वस्त्र चाचण्या पुन्हा सुरू करेल, असा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. काल एका वृत्त वाहिनीशी बोलताना त्यांनी सांगितलं. जेव्हा इतर देश चाचण्या करत असतात तेव्हा चाचणी थांबवणारा अमेरिका हा एकमेव देश नसावा, असंही सुतोवाच त्यांनी केलं. ३० वर्षांपेक्षा जास्त काळानंतर अमेरिका अण्वस्त्र चाचण्या पुन्हा सुरू करण्याची ट्रम्प यांनी घोषणा केली. रशियाने अलीकडेच केलेल्या प्रगत अण्वस्त्र-सक्षम प्रणालींच्या चाचण्यांचा हवाला देत ते योग्य असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

तैवानवर कब्जा करण्याच्या आपल्या कृतीचे परिणाम काय होतील ते चीनला माहित आहेत असं सांगत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी चीनला इशारा दिला आहे. 2027 मध्ये तैवानचा ताबा घेण्याच्या दृष्टीने चीनच्या लष्कराला सज्ज राहण्याचे क्षी जिनपिंग यांचे आदेश असल्याचा अमेरिकेच्या गुप्तचर सूत्रांचा अहवाल आहे. या पार्श्वभूमीवर चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्य भेटीनंतर मुलाखत देताना ट्रंप बोलत होते. दरम्यान, तैवान आणि परिसरात चीनच्या लष्करी हालचाली वाढत असल्याबद्दल अमेरिकेच्या संरक्षण सचिवांनी चिंता व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

अफगाणिस्तानमधे काल रात्री झालेल्या भूकंपामुळे दहा जणांचा मृत्यू झाला असून २६० जण जखमी झाले आहेत. या भूकंपाची तीव्रता रिक्टर स्केलवर ६ पूर्णांक ३ दशांश एवढी नोंदवली गेली आहे. अफगाणिस्तानच्या वायव्य, मध्य, पश्चिम, उत्तर भागात मध्यरात्रीच्या सुमारास हा भूकंप झाल्याचं अफगाणिस्तान आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं म्हटलं आहे. या भूकंपाचा केंद्रबिंदू मजार ई शरिफ शहराजवळ खोल्म इथं असल्यामुळे सर्वाधिक नुकसान याच भागात झालं. जखमींवर उपचार सुरू असल्याचं सांगण्यात आलं आहे.

<><><><><>

युद्धबंदी कराराअतंर्गत इस्रायलला हमासकडून तीन ओलिसांचे मृतदेह परत मिळाले आहेत. त्यापैकी एकाची ओळख पटली असून उर्वरित मृतदेहांची ओळख पटवण्यासाठी ते तेल अविव इथल्या न्यायवैद्यक संस्थेत पाठवण्यात आले आहेत. ओळख पटवण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ते संबंधितांच्या कुटुंबांकडे सुपूर्द केले जातील. ३६० पॅलेस्टिनींच्या मृतदेहांच्या बदल्यात इस्रायलला मिळणाऱ्या २८ मृतदेहांपैकी ८ मृतदेह अद्यापही हमासच्या ताब्यात आहेत.

<><><><><>

आयसीसी विश्वचषक महिला क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात काल दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी मात करत भारतानं विश्वचषक पटकावला. नवी मुंबईतल्या डी वाय पाटील मैदानावर झालेल्या या सामन्यात दक्षिण अफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. भारतानं निर्धारित ५० षटकात ७ बाद २९८ धावा केल्या. शेफाली वर्मानं ८७, दिप्ती शर्मानं ५८, तर स्मृती मंधानानं ४५ धावा केल्या. ऋचा घोषनं ३४ धावांचं योगदान दिलं. या धावसंख्येचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ २७ चेंडू बाकी असतानाच २४६ धावात गारद झाला. भारतातर्फे दिप्ती शर्मानं ५, शेफाली वर्मानं २, तर श्री चरणीनं १ बळी मिळवला. शेफाली वर्मा सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

विश्वचषक पटकावून ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघावर सर्व थरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाचं अभिनंदन केलं आहे. या

विश्वविजेत्या संघाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं ५१ कोटी रुपयांचं रोख पारितोषक जाहीर केलं आहे.

**//<><><><><>//**